महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका//न.क्र.०५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६९५ दिनांक १३ / ०६ / २०२५

**विषय :** पुणे महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत नव्याने समाविष्ट झालेल्या वाघोली येथील शाखा कार्यालयामध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना सुधारीत दराने घरभाडे भत्ता अदा करणेबाबत.

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/ नवि-२२ दि.३०.०६.२०२१

-----

सामान्य आदेश क्र.६८ (क) दि.३०.०६.१९७२ अन्वये महाराष्ट्र शासन यांच्या प्रचलित नियमानुसार कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांना घरभाडे भत्ता (HRA) व स्थानिक पूरक भत्ता (CLA) अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.५५४ दि.२७.०३.२०१७ अन्वये शासन निर्णय क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/९८/सेवा-५ दि.१६.१२.२०१६ नुसार शहरांचे/गावांचे केलेले सुधारीत वर्गीकरण अंगीकृत करुन नवीन वर्गीकरणानुसार अशा शहरांमध्ये/गावांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना सुधारीत दराने घरभाडे भत्ता अदा करण्यात येत आहे.

२. वाघोली हे गाव Z (झेड) वर्गामध्ये मोडत असल्यामुळे वाघोली शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना सदर वर्गीकरणानुसार घरभाडे भत्ता अदा केला जात होता. आता, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांची अधिसूचना क्र. पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२ दि.३०.०६.२०२१ अन्वये वाघोली हे गाव पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने शाखा कार्यालय वाघोली मधील अधिकारी व कर्मचारी यांना X (एक्स) वर्गाकरीता अनुज्ञेय असलेल्या दराने घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्याची बाब विचाराधीन होती. सदर अधिसूचनेची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

३. सबब, सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार शाखा कार्यालय वाघोली अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना दि.३०.०६.२०२१ पासून X (एक्स) वर्गाकरीता विहीत करण्यात आलेल्या दरानुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्यात येत आहे. तसेच दि.३०.०६.२०२१ पासून त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या दराने घरभाडे भत्त्याच्या फरकाची रक्कम माहे जून २०२५ च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी. या कालावधीमध्ये वाघोली शाखेमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याची बदली अन्यत्र झाली असल्यास संबंधित कर्मचारी ज्या कार्यालयांतर्गत कार्यरत आहे अशा कार्यालयाने सदर कर्मचाऱ्यास देय असणारी घरभाडे भत्त्याच्या फरकाची रक्कम अदा करावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:** वरीलप्रमाणे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२
४ था मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० जून, २०२१

शासन निर्णय :- सोबत जोडलेली शासकीय अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२, महाराष्ट्र शासनाच्या असाधारण भाग १ अ, उप विभाग यामध्ये मराठी व इंग्रजी अशा रितीने दिनांक ३०.०६.२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच शासकीय अधिसूचना ग्राम विकास विभाग झेडपीबी-२०२१/प्र.क्र.४ व प्र.क्र.४ (१)/(२)/(३)/(४)/(५)/पंरा-५, महाराष्ट्र शासनाच्या भाग १ अ उप विभाग यामध्ये मराठी व इंग्रजी अशा रितीने दिनांक ३० जून २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(सतीश मोघे)
शासनाचे उप सचिव,

प्रति,

१) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.
( त्यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णयाप्रमाणे अधिसूचना शासनाच्या असाधारण राजपत्रात भाग-एक-अ, उपविभागामध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रती खालील सर्व संबंधितांना पाठवाव्यात आणि १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.)
२) महारजिस्ट्रार, भारत सरकार तथा जनगणना आयुक्त, एन.डी.सी.सी. बिल्डींग II, जयसिंग रोड, नवी दिल्ली-११०००१
३) आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, मुंबई. (१५ प्रती)
४) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे (३० प्रती)
५) आयुक्त व संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई (१५ प्रती)
६) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे (१५ प्रती)
७) जिल्हाधिकारी,पुणे. (१५ प्रती)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (१५ प्रती)
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे (३ प्रती)
१०) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई (१० प्रती) (वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी)
११) संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण, पुणे (५प्रती)
१२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) उप सचिव (पंरा-५), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई. (१० प्रती)
१४) निवड नस्ती, नवि-२२

# अधिसूचना

नगर विकास विभाग,
मंत्रालय,
मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ३० जून, २०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन ... १)

क्रमांक-पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा ५९) यांच्या कलम ३ चे पोट कलम (४) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासन राजपत्र व असाधारण, भाग एक-अ-मध्ये उप-विभाग येथे दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजी प्रसिध्द केलेल्या शासन अधिसूचना क्रमांक पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२, दिनांक २३ डिसेंबर, २०२० अन्वये महाराष्ट्र शासनाने पुणे महानगरपालिका क्षेत्राच्या सीमात फेरफार करण्याच्या दृष्टीने त्यामध्ये काही क्षेत्रे समाविष्ट करण्याचा आपला इरादा जाहीर केला होता ;

आणि ज्याआर्थी, उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने त्यामध्ये नमूद कालावधीत प्राप्त सर्व हरकती व सूचनांचा शासनाने विचार केला आहे;

ज्याआर्थी, भारताचे संविधानाच्या अनुच्छेद २४३ थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेता पुणे महानगरपालिका क्षेत्राच्या सीमांत फेरफार करण्याच्या दृष्टीने त्यामध्ये काही क्षेत्रे समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम(३) च्या खंड(अ) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, पुणे महानगरपालिका यांच्याशी सल्लामसलत करुन व उक्त कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या खंड (अ) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धी केल्यानंतर, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांचा समावेश पुणे महानगरपालिका क्षेत्रात करण्यासाठी, ज्या बृहत नागरी क्षेत्राकरीता पुणे महानगरपालिकापालिका स्थापण करण्यात आली आहे, अशा बृहत नागरी क्षेत्राच्या सीमांत फेरफार करीत आहे. अनुसूची-

एकमध्ये विनिर्दिष्ट क्षेत्रांचा समावेश केल्यानंतर पुणे शहर महानगरपालिकेची सुधारीत हद्द अनुसूची-दोनमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल :-

## अनुसूची — एक

### पुणे शहरात समाविष्ट करावयाच्या क्षेत्रांचा तपशील

| अ.क्र. | महसूली गावाचे नाव | पुणे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या गावांचे क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | म्हाळुंगे | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| २ | सूस | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| ३ | बावधन बुद्रुक | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| ४ | किरकिटवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| ५ | पिसोळी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| ६ | कोंढवे —धावडे | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| ७ | कोपरे | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| ८ | नांदेड | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| ९ | खडकवासला | संपूर्ण गावाचे महसुली क्षेत्र. |
| १० | मांजरी बुद्रुक | संपूर्ण गावाचे महसुली क्षेत्र. |
| ११ | नऱ्हे | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १२ | होळकरवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १३ | औताडे-हांडेवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १४ | वडाचीवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १५ | शेवाळेवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १६ | नांदोशी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १७ | सणसनगर | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १८ | मांगडेवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| १९ | भिलारेवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| २० | गुजर निंबाळकरवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |

| | | |
|---|---|---|
| २१ | जांभुळवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| २२ | कोळेवाडी | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |
| २३ | वाघोली | संपूर्ण गावाचे महसूल क्षेत्र |

## अनुसूची —दोन
## पुणे शहराची सुधारित हद्द

| | | |
|---|---|---|
| १ | उत्तरेस | कळस, धानोरी व लोहगाव या महसूली गावांची हद्द |
| २ | उत्तर-पूर्व | लोहगाव, वाघोली या महसूली गावांची हद्द. |
| ३ | पूर्वेस | मांजरी बु., शेवाळेवाडी, फुरसुंगी या महसूली गावांची हद्द. |
| ४ | दक्षिण-पूर्व | उरूळी देवाची, होळकरवाडी, औताडे हांडेवाडी या महसूली गावांची हद्द. |
| ५ | दक्षिणेस | धायरी, वडाची वाडी, येवलेवाडी, कोळेवाडी, मिलारेवाडी या महसूली गावांची हद्द. |
| ६ | दक्षिण-पश्चिमेस | नांदेड, खडकवासला, नांदोशी- सणसनगर, कोपरे या महसूली गावांची हद्द. |
| ७ | पश्चिमेस | कोंढवे-धावडे, बावधन बु., बावधन खुर्द, म्हाळुंगे, सुस, या महसूली गावांची हद्द. |
| ८ | पश्चिम-उत्तर | बाणेर, बालेवाडी या महसूली गावांची हद्द व पुणे महानगरपालिकेची जुनी हद्द. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सतीश मोघे)
शासनाचे उप सचिव